निम्नश्रेणी लघुलेखक पदावरुन उच्चश्रेणी लघुलेखक
पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेबाबत

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग

शासन आदेश क्रमांक : एएससी १५१८/प्र.क्र.१४१/१४-अ,
खोली क्र. ५५७/५५९ (विस्तार), पाचवा मजला, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
तारीख: २८ ऑगस्ट, २०१९

आदेश

सन २०१८-२०१९ या निवडसूची वर्षामध्ये मंत्रालयीन विभागातील खालील निम्नश्रेणी लघुलेखक (गट (ब) अराजपत्रित - वेतनश्रेणी एस-१४ रु.३८,६०० -१,२२,८००/-) यांना उच्चश्रेणी लघुलेखक (गट (ब) अराजपत्रित- वेतनश्रेणी एस १५ रु.४१,८०० - १,३२,३००/-) पदावर या आदेशाद्वारे विहित अटीच्या अधीनतेने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे. तसेच सदर निम्नश्रेणी लघुलेखक यांची पदोन्नतीनंतर त्यांच्या नावासमोर स्तंभ-५ मध्ये दर्शविलेल्या विभागामध्ये पदस्थापना करण्यात येत आहे.

अ. क्र.	निम्नश्रेणी लघुलेखकाचे नांव	व्यक्तीचा प्रवर्ग	सध्याचा विभाग	उच्चश्रेणी लघुलेखक पदावर पदोन्नती नंतरचा विभाग
१	२	३	४	५
१	श्रीमती छा.भा.कोळंबे (म)	खुला	महसूल व वन विभाग	महसूल व वन विभाग

२. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र.२७९७/२०१५ मध्ये दि.४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरविले आहे. मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. खुल्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यास कोणतीही वैधानिक अडचण नसल्याचे अभिप्राय विधि व न्याय विभागाने दि.२८.१२.२०१७ रोजी दिले आहेत. त्यानुसार तूर्तास पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून भरण्यात यावीत. अशी कार्यवाही करताना सेवाज्येष्ठता यादीमधील मागासवर्गीय अधिकारी/ कर्मचारी यांना पदोन्नती देण्यापूर्वी ते दि.२५.०५.२००४ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळून सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत, याची खात्री प्रत्येक प्रशासकीय विभागाने करावी अशा सूचना सा.प्र.वि./का.१६-ब ने दि.२९.१२.२०१७ च्या पत्रान्वये दिल्या आहेत. त्यानुसार मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या न्यायनिर्णयाच्या अधीन राहून तसेच पुढील अटीच्या अधीन राहून संबंधित निम्नश्रेणी लघुलेखक यांना उच्चश्रेणी लघुलेखक संवर्गात खुल्या प्रवर्गातील रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे:-

१) **सदरची पदोन्नती ही प्रशासकीय निकड म्हणून तात्पुरत्या स्वरुपातील तदर्थ पदोन्नती राहील.**

२) सदर पदोन्नत्या, सद्य:स्थितीत निम्नश्रेणी लघुलेखक या पदाच्या ज्येष्ठता यादीबाबत कोणतेही न्यायालयीन प्रकरण प्रलंबित नाही, तसेच या ज्येष्ठता यादीस आव्हानित देखील करण्यात आलेले नाही ही वस्तुस्थिती विचारात घेऊन केवळ तात्पुरत्या/तदर्थ स्वरुपात देण्यात येत आहेत.

३) **सदर तदर्थ पदोन्नती तात्पुरत्या स्वरुपात असून सदर पदावर संबंधितांचा कायमस्वरुपी धारणाधिकार राहणार नाही.**

४) सन २०१८-२०१९ या निवडसूची वर्षाकरिता पात्र निम्नश्रेणी लघुलेखक यांची निवडसूची तदर्थ स्वरुपाची असून उच्चश्रेणी लघुलेखक पदावरील पदोन्नत्या ह्या तात्पुरत्या स्वरुपाच्या आहेत. **परिणामी निवडसूचीतील निम्नश्रेणी लघुलेखकांना उच्चश्रेणी लघुलेखक नियमित पदाचे व सेवा ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क मिळणार नाहीत.**

५) संबंधित निम्नश्रेणी लघुलेखक यांनी उच्चश्रेणी लघुलेखक पदावरील तदर्थ पदोन्नती न स्विकारल्यास सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र. एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३०३/का.१२, दिनांक १२.०९.२०१६ अन्वये त्यांचे नांव सन २०१८-२०१९ या वर्षीच्या निवडसूचीतून काढून टाकण्यात येईल व पुढील दोन वर्षी होणाऱ्या निवडसूच्यांमध्ये त्यांच्या नावाचा विचार न करता तिसऱ्या वर्षाच्या निवडसूचीत उच्चश्रेणी लघुलेखक पदावरील तदर्थ पदोन्नतीसाठी त्यांची पात्रता तपासण्यात येईल.

६) सदर निम्नश्रेणी लघुलेखक यांची उच्चश्रेणी लघुलेखक पदावरील तदर्थ पदोन्नती ही त्यांच्याविरुध्द प्रस्तुत आदेशाच्या दिनांकापर्यत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरु झालेली नाही वा प्रस्तावित नाही या धारणेच्या अधीन राहून देण्यात येत आहे. संबंधित विभागाने याची खातरजमा करावी.

७) मागास प्रवर्गातील निम्नश्रेणी लघुलेखक यांची पदोन्नती ही शासन निर्णय दिनांक २५.०५.२००४ मधील तरतूदीनुसार त्यांना आरक्षणाचा लाभ मिळून सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत तसेच सदर निम्नश्रेणी लघुलेखकांचे जात वैधता प्रमाणपत्र संबंधित जातपडताळणी समितीने निर्गमित केले आहे या अटीच्या अधीन राहून करण्यात येत आहे. संबंधित विभागाने याची खातरजमा करावी.

८) हे आदेश तत्काळ अंमलात येतील. संबंधित विभागांनी रुजू करुन घेतल्याच्या आदेशाच्या प्रती या विभागास पाठवाव्यात.

३. दरम्यान, पदोन्नतीमधील आरक्षणाबाबत राज्य शासनाने दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ व इतर राज्यांच्या याचिकेबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १५.०४.२०१९ रोजी पुढील प्रमाणे आदेश पारित केले आहेत."*Until further orders status quo, as it exists today, shall be maintained.*" याबाबत कार्यासन १६-ब यांनी खालील प्रमाणे अभिप्राय दिले आहेत.

"दिनांक १५.०४.२०१९ रोजी व आताही या कार्यासनाच्या दिनांक २९.१२.२०१७ च्या पत्रातील सूचना अस्तित्वात आहेत. सबब, पुढील आदेश होईपर्यंत सर्व पदोन्नत्यांबाबत या कार्यासनाच्या दिनांक २९.१२.२०१७ च्या पत्रातील सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी."

सबब, सदर आदेशातील पदोन्नत्या शासन पत्र दिनांक २९.१२.२०१७ मधील सूचनांनुसार केवळ तात्पुरत्या स्वरुपात व कार्यासन १६-ब यांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायानुसार देण्यात येत आहेत.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८२८१३१३०२८४०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Gajanan Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0, serialNumber=54b11b1ccbdc577d71dce3b313c3fef5dc2ad659e360f73b682d6b6fccb8aecf, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2019.08.28 13:23:41 +05'30'

(ग. भि. गुरव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

श्रीमती छा.भा.कोळंबे, निम्नश्रेणी लघुलेखक (महसूल व वन विभाग)

प्रत,

१. अ.मु.स./प्र.स./सचिव, संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
२. सह/उप सचिव (आस्थापना), संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.
३. निवडनस्ती.